राज्यातील शासकीय गोदाम दुरुस्तीच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत. (परभणी शासकीय गोदाम क्र. ३, जि.परभणी) सन २०१८-१९

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः गोदादु-१११६/प्र.क्र.१२७९/नापु-१६-ब
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
तारीख: २३ मे २०१८

वाचा

जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांचे जा.क्र.२०१८/पुरवठा/जीडीएन/कावी ६०६, दि.२१.०३.२०१८ रोजीचे पत्र

प्रस्तावना

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राज्यातील शिधापत्रिका धारकांना जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात येते. भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त होणाऱ्या अन्नधान्याची साठवणूक राज्य शासनाच्या गोदामामध्ये केली जाते. परभणी जिल्हयातील शासकीय गोदामांच्या दुरूस्तीची अंदाजपत्रके संदर्भीय पत्रान्वये शासनास प्राप्त झालेली आहेत. सदर अंदाजपत्रकाची छाननी करुन त्यास प्रशासकीय मंजुरी देण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविली आहे. त्यानुसार परभणी येथील शासकीय गोदाम क्र. ३ या गोदामाच्या दुरूस्तीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

परभणी येथील शासकीय गोदाम क्र. ३ च्या दुरुस्ती कामास व अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधीनतेने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

I. सदर कामांची सन २०१७-१८ च्या दरसुचीवर आधारीत सविस्तर अंदाजपत्रक उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, परभणी यांनी तयार केली असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी व उपभोक्ता विभागाच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी साक्षांकीत केली आहेत.

II. दुरूस्तीस विलंब किंवा इतर कारणांनी गोदाम दुरूस्तीस वाढीव खर्च होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

III. अंदाजपत्रकातील दुरुस्ती कामाच्या आवश्यकतेबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी प्रथमत: खात्री करावी व तद्नंतरच काम हाती घ्यावे.

३. **गोदाम दुरुस्ती कामाची यादी खालीलप्रमाणे-**

अ.क्र	जिल्हा	तालुका	गोदामाचे नाव	कामाचे सर्वसाधारण स्वरुप	अंदाजित खर्च (रु.)	सार्वजनिक बांधकाम विभागाच्या छाननी अंती अंदाजपत्रकीय किंमत (रू.)
१	परभणी	परभणी	शासकीय गोदाम क्र. ३	नवीन पत्रे बसविणे, गोदामाच्या बाहेरील परीसरात सिमेँट काँक्रीटीकरण करुन सीसी नालीचे बांधकाम करणे , फरशी बदलणे , रंगरंगोटी करणे , इत्यादी (अंदाजपत्रकाप्रमाणे)	३०,९९,०६९/-	३१,७७,८६०/-
				एकूण		**३१,७७,८६०/-**
एकूण रुपये- एकतीस लक्ष सत्त्याहत्तर हजार आठशे साठ फक्त						

४. वरीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या शासकीय गोदाम दुरूस्तीकरीता निधी उपलब्ध झाल्यांनतर त्याप्रमाणे दुरूस्तीची कामे करण्यात यावी. निधी प्राप्त झाल्यानंतर शासकीय गोदाम दुरूस्तीची कामे तातडीने सुरू करण्यात येऊन पूर्ण करण्यात यावीत. गोदाम दुरूस्ती सुरू झाल्यांनतर प्रथम दुरूस्तीचा संपूर्ण तपशिल तसेच संबंधित दुरूस्तीचा दरमहा आढावा घेऊन दुरूस्तीची प्रगती जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी शासनास सादर करावी.

५. सदरील गोदाम दुरूस्तीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावीत. त्याकरीता आवश्यक निधी सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करून देण्यात येईल.

६. सदरील शासकीय गोदाम दुरूस्तीची कामे पूर्ण होताच त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्याची दक्षता जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी घ्यावी.

७. प्रशासकीय मान्यतेच्या आदेशात कामाचे संक्षिप्त स्वरूप नमूद करण्यात आलेले असून प्रत्यक्षात गोदाम दुरूस्तीची कामे शासनास सादर केलेल्या दुरूस्ती कामांच्या अंदाजपत्रकानुसारच पूर्ण करण्यात यावीत. म्हणजेच शासनास सादर केलेल्या अंदाजपत्रकात समाविष्ट बाबीनुसार गोदाम दुरूस्तीची कामे पूर्ण करण्यात यावीत.

८. गोदाम दुरूस्तीच्या कामातील अनावश्यक पुनरूक्ती टाळण्याच्या दृष्टीने सदरहू आदेशात नमूद गोदाम दुरूस्तीच्या कामाच्या आवश्यकतेबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी व्यक्तिश: छाननी करावी. गोदाम दुरूस्तीच्या कामातील पुनरूक्ती अथवा विसंगतीबाबत शासनास अवगत करावे.यासंदर्भात पुढील शासन आदेशापर्यंत कार्यवाही स्थगित करावी.

९. सदर जिल्हयातील वर नमूद गोदामास या अगोदर प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी करावी.

१०. सदरील कामावरील खर्च सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात व तद्नंतर वेळोवेळी उपलब्ध अनुदानातुन करण्यात येईल. सदर गोदामाच्या दुरूस्तीवरील खर्च "मागणी क्रमांक एम-०२, लेखाशिर्ष २४०८ अन्न साठवण व वखार साठवण यावरील भांडवली खर्च , ०१, अन्न १०१, प्रापण व पुरवठा (०३), प्रापण वितरण व किंमत वितरण ०३, ०२ (मुफसल) २४०८ ०१०८ २७ लहान बांधकामे" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

११. सदर गोदामाच्या दुरूस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर सदरचे काम हे मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे उत्कृष्ट झाल्याबाबतची खातरजमा संबंधीत कार्यकारी अंभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी संयुक्तरित्या करून तसा स्थल निरिक्षण अहवाल तयार करावा व तो अभिलेखामध्ये जतन करून ठेवावा.

१२. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ च्या भाग पहिला उपविभाग-५ मधील अनुक्रमांक १० नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२६०९२५/उ.स.(इ.मा.).दि.०६.०४.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार सदरचा आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२३१७०९४९२६०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Deoman Baswant

Digitally signed by Sunil Deoman Baswant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=F.C.S and C.P. Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8883fe608dc825b4f80204357f8a6fadfe8507e0636b91f3c5fefef9c43acfe1, cn=Sunil Deoman Baswant
Date: 2018.05.23 17:09:13 +05'30'

(सु.दे.बसवंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. उप आय़ुक्त (पुरवठा), औरंगाबाद विभाग,औरंगाबाद
२. वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, परभणी.
४. जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी.
५. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी.

७. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षण), मुंबई/ नागपूर.
८. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
९. निवासी लेखा परीक्षण अधिकारी, मुंबई (वित्तीय सल्लागार व उपसचिव मार्फत)
१०. वित्त विभाग (व्यय-४, अर्थोपाय व अर्थसंकल्प-३), मंत्रालय, मुंबई.
११. नियोजन विभाग (का-१४११), मंत्रालय, मुंबई.
११. सहाय्यक संचालक (संगणक), लेखा व कोषागारे, मुंबई/नागपूर.
१२. निवड नस्ती/नापु-१६ब